**रयत शिक्षण संस्थेचे,**

# छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा (स्वायत्त)

## विद्यार्थिनी वसतिगृह वार्षिक अहवाल २०२१-२२

- सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात विद्यार्थिनी वसतिगृहामध्ये कमवा व शिका योजनेच्या १७ व इतर ९८ अशा ११५ विद्यार्थींनीनी प्रवेश घेतला.
  **शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये विद्यार्थिनी वसतिगृहामध्ये खालील उपक्रम आयोजित करण्यात आले.**

- दिनांक १६ जानेवारी २०२२ रोजी विद्यार्थिनी वसतिगृह आणि महिला विकास मंच यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थिनीसाठी डॉ. मीना इंजे यांचे 'मुलींच्या आरोग्यविषयक समस्या' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.महिला विकास मंच प्रमुख डॉ. के.व्ही.नलावडे यांनी प्रास्ताविक केले तर वसतिगृह रेक्टर श्रीमती जुई ढवळे यांनी आभार व्यक्त केले.
- दिनांक २२ एप्रिल २०२२ रोजी विद्यार्थिनी वसतिगृह, महिला विकास मंच, प्लेसमेंट सेल यांच्या संयुक्त विद्यमाने 'महिका मुंबई' आणि शारदाबाई पवार अध्यासन, शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर यांच्या मार्फत विद्यार्थिनीसाठी श्री. हिरेन कुलकर्णी आणि श्रीमती अनुपमा रामटेके यांचे 'महिलांविषयक उद्योजकता संधी आणि त्यांची क्षमता बांधणी' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. वसतिगृह प्रमुख डॉ.रोशनआरा शेख यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले.
- दिनांक १३ मे २०२२ रोजी विद्यार्थिनी वसतिगृह, महिला विकास मंच, अँटी रॅगींग समिती यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थिनीसाठी पोलीस हेड कॉस्टेबल श्रीमती नीलम सूर्यवंशी व प्रल्हाद चिरफरे यांचे 'महिलांविषयक कायदे' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.
- विद्यार्थिनी वसतिगृहातील विद्यार्थिनींसाठी लेजर प्लेस येथे आरोग्यविषयक शिबिराचे आयोजन करण्यात आले.
- दिनांक २२ सप्टेंबर २०२१ रोजी पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त, दिनांक १९ फेब्रुवारी २०२२ रोजी छ.शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त तर दिनांक ०९ मे २०२२ रोजी पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त विद्यार्थिनी वसतिगृहामध्ये सर्व विद्यार्थिनींनी वरील सर्व महामानवांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण केली.